प्रकरण चौथे

"सूड" हया दीर्घ कथेचा विचार

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रकरण चौथे

'सूड' ह्या दीर्घकथेचा विचार

बागुलांच्या सर्वच कथांच्या मागील प्रमुख प्रेरणा व भूमिका एका शोधकाची आहे. या अर्थाने त्याचे कथालेखन शोधयात्राच आहे. या शोध-यात्रेतील महत्त्वाचा टप्पा म्हणून 'सूड' या दीर्घकथेचा विचार करणे प्रस्तुत ठरेल.

'सूड' या बाबुराव बागूलांच्या कथेचे लक्षणीय स्वागत झाले. बागुलांच्या सूड या दीर्घकथेसंबंधी अनेकांनी निरनिराळे विचार व्यक्त केले असले, तरी सूड चे परिपूर्ण विश्लेषण झाले आहे असे वाटत नाही. सूड चा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी प्रथम सूड चे कथानक पाहणे आवश्यक आहे.

कथानक सूड चे कथानक वैशिष्टयपूर्ण आहे. कथेतील प्रमुखपात्र जानकी एका मुरळीची मुलगी आहे. ती सुंदर आहे. वयात येताच तिची आई गंगू तिचे खंडोबाशी लग्न लावते. वयात आल्यापासूनच तिच्यावर अत्याचार होत राहतात एवढे, की तिला आपल्या स्त्री असण्याची घृणा येऊ लागते. आपल्या स्त्रीत्वाविषयी एकीकडे घृणा, तर दुसरीकडे पुरुषत्वाविषयी तिरस्कार तिला वाटू लागतो. कोवळ्या वयात पुरुषानी तिच्यावर केलेले अत्याचार तिच्या मनाला उध्वस्त करतात. वेश्यागृहातून बाहेर पडल्यावर सन्याशी वेषात असतानाही ती नरपशूकडून लुटली गेल्याने तिचे स्त्रीत्व पुन्हा एकदा भंगते. या मानसिक अवस्थेत तिला सर्वच पुरुषांबद्दल घृणा, चीड, तिरस्कार, संताप वाटू लागतो. पुरुषाच्या नजरेनेही आपल्यावर बलात्कार होत आहेत अशी जाणीव तिला होऊ लागते. अशा मनाच्या अवघडलेल्या अवस्थेत तिला एक निरागस, चित्ताने प्रसन्न असलेले स्वामी भेटतात. त्यांच्या व्यक्तीत्वाकडे पाहून तिला धीर मिळतो व ती त्याच्यासह तीर्थयात्रा करते. ती आपले स्त्रीत्व झाकून पुरुष वेशात वावरते. आपले स्त्रीत्व नष्ट करावे असे तिला वाटत असते. हिमालयाच्या वाटेवर मात्र तिच्यात आमूलाग्र परिवर्तन होते. देव, देश यांच्या पेक्षा माणूस श्रेष्ठ आहे व माणसाचे सर्वच सुंदर आहे ही जाणीव येथे निर्माण

होते. पुरुषत्व आणि स्त्रीत्व सुंदर आहे व स्त्री पुरुषांचे मीलन ही जीवनाची सुरवात आहे अशी जाणीव तिच्या मनात निर्माण होते. जीवनाचा नविन दृष्टिकोन स्वीकारून ती मरणाला सहजतेने सामोरी जाते. येथे ही कथा संपते.

कथानक निवडीचे प्रयोजन.

जानकी या स्त्रीवर होणारे अत्याचार व तिचे मानसिक परिवर्तन हे दोन धागे या कथेमध्ये आहेत. बागुलांना केवळ दलित स्त्रीचे चित्रण करायचे नसून एकूणच स्त्री जातीची वेदना आणि तिची अवहेलना बेशीवर टांगण्याची आहे. पुरुषांनी संस्कृतीच्या नावाखाली स्त्रीला दिलेले दुय्यम स्थान, आपल्या विकृतीनाही दिलेली सांस्कृतिक प्रतिष्ठा, नैसर्गिक मूळ भावनांना दिलेले किळसवाणे रूप त्यांना चित्रित करायचे आहे. जानकीच्या पूर्वीच्या आयुष्यात पशूसारखे जीवन जगणारा माणूस आणि संन्यासाश्रमातही संस्कृतीच्या वेषातील मानवरूपधारी पशू यांचे परस्परविरोधी तरीही परस्पर संबंध नाट्य साकार करण्यासाठी अद्भूत, कल्पनारम्य, आणि पौराणिक संदर्भ असलेल्या पार्श्वभूमीची व वातावरणाची आवश्यकता होती. यातील अनुभवच अशा प्रकारच्या कथात्मकतेची मागणी करीत आहेत हे बागुलांनी ओळखून अनुभवाला स्वाभाविक असा कथेला आकार दिला, यातच बाबुरावांचे एक श्रेष्ठ कथाकार म्हणून यश आहे.

'सूड' ही दीर्घकथा मूलत: जानकीच्या जीवन दु:खाशी व मानसिक द्वंद्वाशी संबंधित आहे, म्हणून जानकीचे व्यक्तिचित्र लेखकाने कसे चित्रित केले आहे, ते पाहू.

जानकी : सूडची कथा म्हणजे जानकीची कथा होय. जानकीच्या देहाची केलेली विटंबना आणि त्यामुळे स्त्रीत्व नाकारणारी व पुरुषत्व धिक्कारणारी आणि त्यासाठी तप करायला प्रवृत्त झालेली जानकी यातून व्यक्त होते. कथेच्या शेवटी जानकीच्या मनात झालेले परिवर्तनही लेखकाने दाखविले आहे. लेखकाने जानकीच्या मनात होणारे बदल टिपले आहेत. जानकीचे व्यक्तिचित्र तिला आठवलेल्या भूतकालीन स्मृतिचित्रातून स्पष्ट होत जाते.

जानकी ही एका मुरळीची मुलगी, वारस असून बेवारशी जगरो वाट्याला घेऊन आलेली. जानकीची आई गंगू वेश्याव्यवसाय करणारी व जानकीनेही आपल्यासारखाच देह विकून पैसा मिळवावा व जीवन सुखाने जगावे अशी विचारसरणी बाळगणारी. जानकीचे बालपणी आणि तरुणपणी अनुभवलेले जीवन किळसवाणे आणि उबग आणणारे आहे. जानकीच्या कोवळ्या वयातच काही आगाऊ मुले तिच्यावर बलात्कार करतात. हा तिच्या जिवनातला पहिला प्रसंग. या प्रसंगाने ती भिते, रडते, आईजवळ तक्रार करते. पण आई तिला धीर देण्याऐवजी म्हणते " येड्या डुकरणी उरावर बवकभर ऊर आलं तरी तुला अक्कल नाही, अजून रडू येत ... स्वयपाक कर, चांगला कर.... यांचा मुक्काम इथंच होय." [१] म्हणजे जिने धीर देऊन आधार द्यावा तीच आई तिच्या भावनांना लाथाडते. येथूनच जानकीच्या मनातील एकेका आदर्शांना सुरुंग लागतो. आई, बाप, सासरा, नवरा ही नाती किती कुचकामी आहेत, याची जाणीव तिला होऊ लागते आणि तिच्या मनात एक बंडखोर वेदना जन्म घेऊ लागते. रा. ग. जाधव म्हणतात, 'संस्कृतीच्या रक्षणासाठी पुरुषत्व जपायचे नित्याच्या आदिम भुकेसाठी एका वर्गातील स्त्रीत्व हक्काने नासवायचे ही जानकीच्या आत्म्याची खरी वेदना आहे." [२] हे जाधव यांचे विधान योग्यच आहे. जानकीच्या मानसिक आंदोलनाला येथूनच सुरवात होते. स्त्रीत्वाला नकार आणि पुरुषत्वाचा स्वीकार ही यातील पहिली पायरी आहे. जानकीला पुरुष व्हावेसे वाटते. व पुरुष होऊन सूड उगवावा ही भावना तिच्या मनात अंकुरित होते. जानकीला सूड घ्यायचा आहे, तो समाज, संस्कृती, पुरुष यांच्यावर. जानकीच्या प्रारंभीच्या आयुष्यातील प्रसंगाने ती ज्वाला बनते आणि ज्वाला ची ठिणगी जानकीत जागृत आहे.

जानकी बंडखोर ठरते कारण ती परिस्थितीला शरण जाण्याचे नाकारते. जातकुळ समाजमान्यता, जमीन, पैसा यातील काहीही नसलेली जानकी जन्माला मात्र सुंदर देह घेऊन आलेली आहे. या देहाचा ती तिरस्कार करते. मुरळीची पारंपारिक शरणता ती झिडकारते.

लहान वयात झालेला बलात्कार, आईच्या बीभत्स वागण्याचे पाहिलेले ओंगळ दृष्य, वेश्यागृहातील विटंबना यांनी जानकी होरपळून निघाली आहे. पुरुषी वासनेला बळी पडणारे मादीपण नष्ट करण्यासाठी संन्यास घेतला पण तिथेही संन्याशीवेषातील पुरुषाच्या वासनेची ती शिकार बनली. जानकीच्या दुःखाचा जन्म तिच्या स्त्रीत्वातच होतो. तिचा देहच तिच्या दुःखाचे कारण ठरतो. निसर्गाने दिलेली सुंदर देहाची देणगी, आणि प्रथा परंपरांनी, पुरुषांनी त्यांचा केलेला जीवघेणा पाठलाग यातून जानकी दोनदा आत्महत्या करायला प्रवृत्त होते. दुःखाच्या पहिल्या उभाऱ्यातच ती आत्मघाताचा विचार करते. स्वामीच्या पहिल्या भेटीत ते विचारतात, 'कुठे निघालीस'? त्यावर जानकी म्हणते 'देवाकडं हिमालयाकडं नाहीत मृत्यूकडं'! सन्यास घेण्याचे दुःख आणि दुष्टता हेच कारण ती सांगते. जेथे जानकीच्या व्यक्तिगत विटंबनेचे दुःख आहे. तिला नाश हवा आहे पण कसला, याचे तिच्याजवळ उत्तर नाही. जीवनाच्या पहिल्या भागात प्रचंड संताप, सूडभावना व त्वेश यांचा डोंब तिच्या मनात थैमान घालत आहे.

जानकीच्या जीवनाच्या दुसऱ्या भागाची सुरुवात स्वामींच्या भेटीने होते! स्वामीच्या भेटीने तिच्या मनाला दिलासा मिळतो. तिच्या भंगलेल्या माणुसपणाला आशास्थान प्राप्त होते.

जानकी संन्याशी म्हणून वावरताना ज्वालाप्रसाद हे पुरुषी नाव घेवून वावरते. तिचा गुरुबंधू विद्याचरण तिचे स्त्रीत्व हेरतो, तिरुमतीला ती रजस्वाला होते. जानकी आपले स्त्रीत्व कितीही प्रयत्न केला तरी लपवू शकत नाही. मानवाची निसर्गाविरुद्ध विजय मिळविण्याची चाललेली धडपड व निसर्गाने मानवाची केलेली चेष्टा जानकीच्या रूपाने प्रकट होते.

जानकी जसे आपले मादीपण लपवू शकत नाही; टाकू शकत नाही, तसेच गतकालीन जीवनाचे संदर्भही विसरू शकत नाही. स्टेशनवरील काळोख तिला दबा धरून बसलेल्या बैराग्यासारखा वाटतो, अनेक पुरुषांच्या नजरा तिला बलात्काराचे स्मरण करून देतात. जानकीला भूतकालीन घटनांचे भूत

पुन:पुन्हा पछाडते. एवढेच नव्हेतर भूतकालीन घटनांच्या स्मरणाने ती क्षुब्ध होते. म्हणजेच ज्वाला प्रसाद हे नाव घेऊनही ती आपले स्त्रीत्व विसरु शकत नाही. स्वत:चे स्त्रीत्व गोदावरीला अर्पण करुनही ती गतकाळ विसरु शकत नाही. तिच्या झगड्यातील हा एक भाग.

जानकीच्या जीवनात संन्यास घेतल्यानंतर स्वामीजींच्या भेटीमुळे बदल होऊ लागला. सूड भावना कमी होऊ लागली. पुरुषा तील पुरुषोत्तमत्व स्वामीच्या रूपाने तिला प्रतीत होऊ लागले. देव, देह याचेपेक्षाही माणुसकी असलेला माणूस श्रेष्ठ आहे ही जाणीव तिला होते. माणसातील पशुत्वाच्या अनुभवामुळे माणसातील मानवतेच्या श्रद्धेला तडा बसलेला असतो पण स्वामींच्या रूपाने तिला माणूस भेटतो. विनाशाच्या मार्गावरुन जानकी विकासाकडे जाऊ लागते. तिच्या मनातील सूडभावना, स्त्रीदेहाविषयीचा तिरस्कार, संपुष्टात येऊ लागतो. जगात माणसाने निर्माण केलेल्या सर्वच गोष्टी सुंदर आहेत, एवढेच नव्हे, तर त्वा सूड ही सुंदर आहे असे म्हणणारा स्वामी तिला जीवनविषयक नवा दृष्टिकोण देतो. जे दु:ख पाहून येतात, ते दिव्यचमत्कार करतात, देवत्व आणतात या स्वामींच्या वाक्यातून तिला नवजीवनाचा साक्षात्कार होतो. लौकिक - अलौकिकात अडसर असणारा त्रिशूल ती टाकते. ज्वालाप्रसादचे हे परिवर्तन फार महत्त्वाचे आहे.

जानकीला नवा जीवनार्थ सापडला आहे. कथेच्या अखेरीस स्वामीसोबत मुक्तस्थान करुन रात्री त्यांच्याशी एकरूप होण्याचा ती प्रयत्न करते. स्वामींच्या सहवासात ती फुलते, नवे जीवन जगू पाहते, स्त्रीदेहाचा खरा अर्थ तिला त्यावेळी समजतो. शेवटी जानकी प्रसन्नपणे मरणाला सामोरी जाते. कारण मरणालाही सौंदर्य प्राप्त झाले होते. जानकीच्या जीवनातील हा बदल उदात्त जीवनाचे दर्शन घडवितो. जीवनातील घाणीकडून सौंदर्याकडे, स्त्रीत्वाच्या धि:कारापासून स्वीकाराकडे जानकीची होणारी वाटचाल म्हणजे बागुलांच्या आशावादी प्रवृत्तीचे दर्शन.

लेखकाने जानकीच्या रूपात फक्त दलित स्त्रीचीच व्यथा चित्रिली आहे असे नाही तर लेखकाने एकूणच स्त्रीजीवनाची कहाणी सांगितली आहे. हयामुळे ही कथा प्रतिकात्मक ठरते. एकीकडे ती एका व्यक्तीची असूनही दुसरीकडे ही कथा संपूर्ण मानवाच्या दुःखाची कथा होते. या कथेला निश्वात्मकता प्राप्त होते.

रा. ग. जाधव यांना जानकी मध्ये 'इव्ह' दिसते.[३] तर प्र.श्री. नेरूरकरांना तिच्यात 'मेनकेचे' रूप दिसते.[४] तर रा.भि. जोशी म्हणतात, 'त्याप्रमाणे जानकी केवळ दलित स्त्रीचे रूपक नाही, तर ती स्त्रीजातीच्या दुःखाची प्रतिनिधी आहे.'[५] बागुलांनी एकीकडे जीवनातील जानकीच्या रूपाचे, वास्तवाचे दर्शन घडवायचे आहे तर दुसरीकडे ते कसे असावे याचा आदर्श स्त्रीमीच्या निमित्ताने मांडायचा आहे.

प्रारंभी एका वेश्येची मुलगी असणारी जानकी जीवनाच्या दाहक सत्यातून नव्या रूपात प्रगटली आहे. यातच बागुलांच्या आशावादी, जीवनवादी, मानवतावादी विचारसरणीचे दर्शन घडते.

अलखनिरंजनस्वामी : 'सूड' या कथेतील हे एक महत्त्वाचे पात्र आहे. जानकीच्या जीवनातील बदलास स्वामीजी कारणीभूत आहेत. स्वामीजींच्या रूपानेच जानकीला जीवनाचे आश्वासन मिळते. स्वामी विरागस आहेत. पाप - पुण्य, दंभ, ढोंग यांचा स्पर्शही त्याच्या जीवनाला झालेला नाही. स्वामी जानकीला तिच्या संन्यासग्रहणाचे कारण विचारतात. त्यावेळी दुःख आणि दुष्टता हे कारण सांगते. आणि अचानक चीड व त्वेष यांनी बेभान होते, तिचा चेहरा भेसूर होतो. स्वामी तिला नकळत जवळ घेतात. जानकीच्या देहस्पर्शाचा अर्थ त्यांना लावता येत नाही. ते विचारतात, " हा लहान मुलासारखा नरम रेशमी स्पर्श कोणाचा असतो ? छातीला जे टेकताच सुखद वाटले ते कवी कालिदासाने वर्णन केलेले उरोज होते की काय "[६] या त्यांच्या उद्गारातून त्यांच्या व्यक्तीमत्वातील निरागसता, शुद्धभाव लक्षात येतो. स्वामी जानकीला अभय देतात. जानकीच्या स्त्रीत्वाला स्वामींचा आधार मिळतो. स्वामीशिष्य विधाचरण्याचा गैर अर्थ लावतो. यात्रेत जानकी व स्वामी यांच्या सहवासाचा विपरीत अर्थ लावतात. परंतु

स्वामी लौकिकाच्या पलिकडे गेलेले आहेत. संपूर्ण जीवनाकडेच स्वामी सुंदरतेच्या दृष्टीने पाहत होते. जानकीसमवेत एकांतात नेहमी राहूनही, स्वामींच्या मनाला वासनेचा स्पर्श कसा झाला नाही याचे जानकीला आश्चर्य वाटते. एवढेच नव्हेतर जानकी संपूर्ण कपडे काढून सरोवरात स्नान करताना स्वामी पाहतात पण स्वामींच्या डोळ्यात वासनेपेक्षा शुध्द आनंदच तिला दिसतो. स्वामीबद्दल विचार करताना तिचे मन म्हणते - " हा माणूस आहे का प्रत्यक्ष परमेश्वर ? याला माणसाच्या जगातील काहीच कसे कळत नाही. इतकी वर्षे संगती राहूनही याने वासना कशी व्यक्त केली नाही.[७]

यातून एक उदात्त, निरागस, आदर्श मानव साकार होतो. जानकीला तो जीवनाची सौंदर्यदृष्टी देतो. मानवी विचार, विकार, भावना, राग, सूड सर्वच सुंदर आहे, म्हणूनच जानकीचे वास्तव अर्थाने भयंकर असणारे जीवनही सुंदर आहे असे तो म्हणतो. हा स्वामी संस्कृतीपूर्वीच्या अवस्थेतील वाटू लागतो. मानवी व्यवहाराच्या पल्याड गेलेला वाटतो म्हणूनच रा. ग. जाधव यांना त्यात 'आदम' दिसतो.[८] खरे तर बागुलांना स्वामींच्या रूपाने मानवीतील आदर्श माणूसपण दाखवायचे आहे. देव, देव यांच्यापेक्षा माणूस श्रेष्ठ असतो, हा माणूस स्वामीच्या रूपाने प्रकट होतो. जानकीची धडपड माणूस होण्यासाठीच चाललेली असते. तिला मादीपण नको आहे. असे माणूसपण स्वामीजवळ तिला सापडते. बागुलांची भूमिकाही हीच आहे. ते म्हणतात, 'एक लेखक म्हणून माझी ठाम श्रध्दा आहे, की माणूस खरोखराच देव, धर्म, आणि देशापेक्षा मोठा असतो पण कोणता माणूस ? जो माणूसच असतो तो. माणसात काही माणसं माणूस नसतात.... फक्त पुरुष असतात.... नर असतात.'[९]

जानकीच्या निमित्ताने लेखकाने दलित, पीडित, शोषित समाजाची सद्:स्थिती व्यक्त केली आहे, तर स्वामींच्या निमित्ताने श्रेष्ठ मानवीजीवनाचा आदर्श समोर मांडला आहे. आदिम अवस्थेत अडम आणि इव्ह ज्या निरागस, निर्मळ मन:स्थितीत जीवनाला सामोरे गेले असतील तीच अवस्था त्यांची आहे. लेखक लिहितो; " संबंधी सृष्टी शून्यात गेल्यासारखी झाली होती, दूर क्षितीजापर्यंत सभोवार दाटलेली नीरवता पाहून ज्वालेला सृष्टीवर अवतरलेल्या पहिल्या जोडप्याची आठवण झाली"[१०] यातूनच संस्कृति-

पूर्व अवस्थेशी त्यांचे नाते जुळत्याचे दिसते. आता जानकीला हव्या असणाऱ्या नाशाची कल्पना स्पष्ट होते. जानकीला नाश हवा आहे, तो खोटेपणाचा संस्कृतीनतेचा, व विकृतप्रवृत्तीचा, तिला नाश हवा आहे भेदाभेदाचा. जानकी वस्त्रे काढून नग्न होते याचा अर्थ मानवी व्यवहारातील सर्व कृत्रिमतेची आवरणे फेकून सत्याला समोरी जाते. संस्कृतीवर प्रकृतीने मिळवलेला हा विजय आहे. आदर्श मानवी जीवनाचा हा आरंभबिंदू आहे.

स्वामी आणि जानकी यांची तुलना काही समीक्षकांनी विश्वमित्र मेनका यांच्याशी केली आहे. परंतु ही तुलना योग्य नव्हे. रा.भि. जोशी म्हणतात, विश्वमित्रासारखा कोणीपुरुष तपश्चर्या करतो आहे आणि मेनकेसारखी कोणी स्त्री त्याचा तपोभंग करण्याला आलेली आहे. अशी ही कथा नाही.[११] स्वामीचे उदात्त जीवन आणि जानकीचे हीन जीवन अशा दोन जीवन पध्दतीची वीण या कथेत बागुलांनी विणली आहे. ही वीण विणत असताना स्वामी, जानकी सारख्या प्रभावी व्यक्तिरेखेप्रमाणेच इतरही व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत.

गंगूच्या निमित्ताने पारंपारिक हीन संस्कृतीच्या बलात्काराला बळी पडलेली व अगतिकपणे तेच जीवन श्रेयस्कर मानून आपल्या मुलीलाही देहविक्रयाच्या व्यवसाय करायला भाग पाडणारी स्त्री येथे दिसते. गंगूच्या निमित्ताने लेखकाने दलित स्त्रीची अगतिकता त्यांची जीवनसरणी कशी हीन बनवते हे दाखवले आहे.

विधाचरणाच्या रूपाने पारंपारिक संस्कृतीचा कडवेपणा चित्रित केला आहे. हीन वातावरणात स्त्री उपभोग्य आहे तर उच्च वातावरणात स्त्री त्याज्य आहे. अशा दुहेरी कात्रीत जानकी सापडलेली आहे. विधाचरण हा मध्ययुगीन काळातील कर्मठ ब्राम्हणी वृत्तीचे द्योतक आहे, तर स्वामी वेदकालातील सर्वसमावेशक दृष्टीच्या महर्षीचे प्रतीक आहेत. लेखकाला स्वामी व विधाचरणच्या निमित्ताने धार्मिक, सांस्कृतिक संदर्भ द्यायचा असावा. विधाचरणच्या रूपाने कर्मकांड तर स्वामींच्या रूपाने श्रेष्ठ मानवतावाद यांचे विरोधी नाट्य लेखकाला सूचित करायचे आहे.

सूड मधील नाट्य·

सूड ही एक संघर्षकथा आहे जानकीच्या जीवनचित्रणाच्या द्वारे चार प्रकारचा संघर्ष लेखकाने चित्रित केला आहे·

यातील संघर्षाचे पहिले रूप म्हणजे समाज विरुद्ध जानकी असा आहे· पुरुषत्व विरुद्ध मादीपण असा संघर्ष आहे·

या संघर्षाचे स्वरूप स्वामीभेटीनंतर बदलते· एकंदर पुरुषीसंस्कृती व स्त्रीवरील अन्याय असे त्याला रूप येते· जानकी पुरुषी वेश धारण करते पण स्त्रीत्वापासून ती स्वत:ची सुटका करून घेऊ शकत नाही·

जानकीच्या मनातील संघर्ष स्वामींच्या सहवासात संपुष्टात येतो· असे नाही तो मनात सुरु होतो· स्वामीचे निरायास वागणे, विधाचरण व इतरेजनांची संशयी नजर तिला अस्वस्थ करते· स्वामीच्या आपुलकीचा, प्रेमाचा अर्थ वासनेशी लावावा काय ? याचा ती निर्णायक अर्थ लावू शकत नाही· आजपर्यन्त भेटलेल्या पुरुषांच्या देहाची, वागणुकीची तुलना ती पुन:पुन्हा स्वामीशी करते·

अंतर्मनातील संघर्षाचे आणखी एक रूप म्हणजे भूत व वर्तमान यांच्याशी चाललेला तिचा संघर्ष· जानकीला स्त्रीत्वसूचक नावही नको असते कारण स्त्रीत्वाशी बलात्कार, अत्याचार, घृणा यांचेच नाते जोडले गेले आहे· म्हणून ती ज्वालाप्रसाद हे पुरुषी नाव धारण करते· नाव बदलून गतकालातील संदर्भ तिला विसरायचे असतात· पण वर्तमानातील घटना नाईलाजाने तिला भूतकालातील घटनांची आठवण करून देतात·

जानकीच्या पूर्वायुष्यातील जीवनाचे संदर्भ हीनसंस्कृतीचे दर्शन घडवितात, टारगट पोरांच्या निमित्ताने विकृती, विधाचरणच्या रूपाने श्रेष्ठ संस्कृतीतील कर्मकांड समोर येते, साधूच्या बलात्कारातून संस्कृतिपूर्व प्राकृतिक निरागसता प्रतीत होते· अशाप्रकारे या कथेत हीन सांस्कृतिकता, त्यातील ढोंगीपणा विकृती, प्राकृतिकता यांच्या संघर्षाचे मनोज्ञ रूप पहावयास मिळते· या सर्व संघर्षातून लेखकाला मानवी मनाचे विविध नमुने समोर मांडायचे आहेत व त्यातून मानवी तत्त्वाची प्रतिष्ठापना करायची आहे·

'सूड'ची निवेदन पध्दती आणि भाषाशैली

'सूड' कथेची निवेदन पध्दती लक्षणीय आहे. प्रा. रा.ग. जाधव म्हणतात, 'ही कथा अखंडपणे गतकालीन व वर्तमानकालीन अनुभवांचा सांधा जुळ्वीत जाणारी आहे. तिचे निवेदन गतिमान आहे, प्रवाही आहे, पण ते सतत स्मृतिचित्रे नि सध:चित्रे यांची सांगड घालत जाणारे आहे. जानकीच्या जीवनातील घटनांचा अर्थपूर्ण अन्वय लावणारा हा प्रवाही घाट आहे. सतत मागेपुढे आंदोलत राहणारा हा आकृतिबंध या कथेत आहे.'[१२] जाधव यानी केलेले हे भाष्य उचितच आहे. कथेचे निवेदन गतिमान आहे कारण जानकीच्या मानसिक आंदोलनांची गतिमानता त्याला लाभली आहे. जानकीचा हा 'स्व'ला शोधण्याचा प्रवास तेवढाच प्रवाही आहे. बागूलांनी आत्यकथनात्मक आविष्काराचा मोह टाळ्यानेच या कथेला हा आशयानुसारी घाट प्राप्त होऊ शकला. यात बागुलांना कलावंत म्हणून श्रेष्ठ दर्जाचे यश लाभले आहे. म्हणूनच प्रतिकरम्य आदिम जगाकडे जानकीची जीवनकथा सहजपणे वाटचाल करते. संस्कृतीने निर्माण केलेले एकही नाते तिला आधार देऊ शकले नाही म्हणून ती संस्कृतीचाच सूड घेण्यास उद्युक्त होते. संस्कृतीचा सूड घेण्यासाठी संस्कृतीच्या पल्याड जाणे आवश्यक असते. संस्कृतीच्या पल्याड काहीच असत नाही. देव ही संकल्पनाही संस्कृतीतच असते म्हणून येथे देवत्वही नाकारावे लागते. अशी ही हीनसांस्कृतिकतेपासून प्राकृतिकते पर्यन्तची वाटचाल लेखकाने संयमाने रेखाटली आहे. जानकी, स्वामी विधाचरण, गंगू यासारखा व्यक्तिरेखाही तेवढयाच समर्थपणे चितारल्या आहेत.

कथेचे निवेदन करताना लेखकाने जो भाषिक अविष्कार केला आहे, तोही वैशिष्टयपूर्ण आहे. औचित्यपूर्ण भाषेचा वापर हा या कथेचा विशेष होय. वेश्यागृहातील पुरुषांची व गंगूची भाषा पाहताना तेथील हीन हिडीसपणाचा प्रत्यय येतो. गंगू आपल्या पतीला म्हणते, ये मुडघा, कोणालाशिवी देतोस ? तुह मड मी कुरवितेः बस. श्याण खातोस अन् मलाच पाण्यात पाहतोस. इकड ये. तुला खखाखसा कुरविते.'[१३] तसेच टारगट मुले जेव्हा जानकीची छेड काढतात तेव्हाची त्यांची वाक्ये पाहा.

'काय चालतीय· आयला मस आवा पायल्या, पण या पोरीवाणी चाल कुठ पायली नही अन देखणी बी वाटत इथंच लोळ्वावी'[१४] या भाषिक अविष्कारातून त्यांच्या वृत्ती, प्रवृत्तीचे, विचार विकारांचे दर्शन घडते· स्वामींची भाषा त्यांची निरागसता प्रकट करते· बागुलांनी भाषेचा स्वाभाविक अविष्कार केला आहे· कुठेकुठे त्यांची भाषा ~~स्वाभाविक अविष्कार केला आहे· कुठेकुठे त्यांची भाषा~~ काव्यात्मकतेच्या जवळ जाते उदा· 'उत्सुक जळराशीतून जसा जळजळता विजेचा लोळ कडाडत बाहेर पडतो, तशी जानकी सूड संतापाने आपल्या आत धगधगत होती'[१५] किंवा

'बाहेरच्या क्रूर काळोखाला अनेक हिस्त्र डोळे फुटले होते· ते गुरगुरत होते· आणि पुढे सरकत होते,···· अन् चंद्र ज्वालेतून प्रकट होण्या-या याज्ञसेनीप्रमाणे बाहेर येत होता'[१६] वातावरण जिवंत करण्याचे सामर्थ बागूलांच्या भाषेत आहे· त्यांची भाषाशैली कृत्रिम काव्यात्मकतेच्या मागे लागत नाही· रोखठोक प्रभावी अविष्कार हेच त्यांचे वैशिष्टय आहे·

'सूड'या दीर्घकथेला एक विश्वात्मक मूल्य मिळाले आहे· ही कथा जानकी नावाच्या दलित मुलीची कथा असतानाच ती अखिल मानवजातीची कथा आहे· जानकीचा संघर्ष माणुसकीच्या प्रतिष्ठापनेसाठी आहे· माणुसकीची प्रतिष्ठापना हा दलित साहित्यातील महत्त्वाचा विचार आहे· संस्कृतिपूर्व अवस्थेतील निरागस मानवता ही बागुलांना हवी आहे· नाश हवा तो नवनिर्मितीसाठी· म्हणून संघर्ष अटळ ठरतो· संघर्ष , नाश पुन:संस्थापन असे या कथेचे स्वरूप आहे· हीनसंस्कृतीचा नाश, त्यासाठी संघर्ष व त्यातून नव्या मानवतावादी मूल्याची जडणघडण हे बागूलांचे स्वप्न आहे· म्हणून रा· ग· जाधव म्हणतात, 'सूड' कथा मात्र मनाला उन्नत करते, उन्नतीची संभवतीमता सुचविते'[१६] जानकीच्या माणूसपणाची प्रतिष्ठापना, तिच्या स्त्रीला मिळालेले सौदर्यपूर्ण अभय, मानवीविकासाना लाभालेले सौदर्यपूर्ण रूप, त्याला मिळालेले विश्वात्मक मूल्य हेच या कथेचे यश आहे·

दलित समाजाला पारंपारिक हीन, हिडीस सांस्कृतिक संदर्भ पुसून टाकून नव्या क्षितीजपासून नव्या जीवनाला प्रारंभ करायचा आहे. त्यासाठी जानकीने जशी तिच्या अपमानित, किळसवाण्या पूर्वजीवनाला तिलांजली दिली तशी तिलांजली देऊन तशी प्राकृतिक कथा निर्माण करायची आहे. रा. ग. जाधव म्हणतात त्याप्रमाणे नव्या आदम व नवी ईव खऱ्या अर्थाने दलित समाजालाच हवी आहे. ही दलितांची नवी मिथ आहे.[१८]

'सूड' कथेतून दलित स्त्रीच्या वेदनेची कथा बागुलांनी मांडली आहे. म. ना. वानखडे म्हणतात - 'ही दीर्घकथा दलितवाङ्मयातील एक अत्यंत परिणामकारक जहाल अशी कथा झाली आहे.[१९] परंतु रा. भि. जोशी यांना जानकीच्या दुःखाला दलितत्वाची मर्यादा घालणे योग्य वाटत नाही, ते म्हणतात, 'ही कथा शेवटी एखाद्या वर्गाची विशिष्ट सामाजिक परिस्थितीची प्रतिनिधी न होता सर्व मनुष्य जमातीची सार्वजनिक आणि सार्वकालिक होते.[२०]

'सूड' या कथेतील वातावरण, पार्श्वभूमी एका दलित मुलीच्या जीवनाचे नाट्य चित्रित करणारे आहे, परंतु ही कथा केवळ दलितांच्या दुःखापुरती मर्यादित नाही. स्त्री म्हणून तिच्या वाट्याला येणाऱ्या दुःखाचे चित्रण सार्वत्रिक, सार्वकालीन व विश्वात्मक बनते. त्या दुःखाच्याही पलीकडे जाऊन बागूल आदर्श माणसाचे चित्रण करतात. कारण बागुलांना माणूस घडवायचा आहे. माणसात माणसाची स्थापना करायची आहे. म्हणून त्यांची वेदना मानवजातीची संवेदना आहे, त्याला विश्वात्मक अर्थ प्राप्त होतो. 'सूड' मध्ये नव्या मूल्यांची स्थापना व माणुसकीची घडण हे संदर्भ कथेला सार्वकालिकता व सार्वजनिकता प्राप्त करून देतात. दलित लेखक म्हणून बाबुराव बागूल हे दलितपणाच्या सामाजिक मर्यादित अथवा आर्थिक शोषणाच्या विचाराच्या मर्यादित कुंठित झालेले नाहीत. दलितपणा सामावून घेऊन ते लेखक म्हणून विश्वात्मक पातळीवर जातात हा प्रत्यय त्यांची 'सूड' ही दीर्घकथा देते.

संदर्भ

१. बाबुराव बागूल — 'सूड,' २ री आ., मुंबई, लोकवाङ्मय गृह, जून, १९८०, पृ. २१

२. रा.ग. जाधव — 'निळी पहाट,' १ ली आ., वाई, प्राज्ञ पाठशाला मंडळ, १९७८, पृ. ११८

३. ———— — तत्रैव पृ. १२०

४. रा.भि. जोशी — 'सूड,' सत्यकथा (मे. १९७२) पृ. ४१

५. ———— — तत्रैव पृ. ४२

६. बाबुराव बागूल — पूर्वोक्त, पृ. २३

७. ———— — तत्रैव पृ. ६३

८. रा.ग. जाधव — पूर्वोक्त, पृ. १२३

९. बाबुराव बागूल — दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान, नागपूर, बुध्दिष्ट पब्लिशिंग हाऊस, जून, १९८१, पृ. २२३

१०. बाबुराव बागूल — पूर्वोक्त पृ. ७१

११. रा. भि. जोशी — पूर्वोक्त पृ. ४१-४४

१२. रा.ग. जाधव — पूर्वोक्त पृ. १२३

१३. बाबुराव बागूल — पूर्वोक्त पृ. २०-२१

१४. ———— तत्रैव पृ.१८

१५. ———— तत्रैव पृ.९

१६. ———— तत्रैव पृ.७६

१७. रा.ग. जाधव पूर्वोक्त पृ.११८

१८. ———— तत्रैव पृ.१२३

१९. म.ना. वनखडे प्रस्ता. सूड,२ री आ.,मुंबई,लोकवाङ्मयगृह जून १९८०,पृ.५

२०. रा.भि. जोशी पूर्वोक्त पृ.४४